Prahar 27.02.2018
Page No. 06

# यशस्वी होऊन आपल्या खेड्यात जा आणि आपल्या खेड्याचे जीवनमान सुधारा

## पद्मश्री लीला पूनावाला यांचे प्रतिपादन



▶ रत्नागिरी

प्रतिवर्षीप्रमाणे फिनोलेक्स अ‍ॅकॅडमी ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नोलॉजी, रत्नागिरी येथे वार्षिक स्नेहसमेलन २०१८ चा उद्घाटन सोहळा आणि संस्थापक पी. पी. छाब्रिया यांच्या स्मृतीप्रत्यर्थ फाऊंडर्स डे २५ फेब्रुवारी २०१८ रोजी पार पडला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून पद्मश्री लीला पूनावाला आणि विशेष अतिथी म्हणून समीर दुआ आणि श्री. बी. बी. आहुजा उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर श्रीमती अरूणा कटारा, अध्यक्ष, होप फाऊंडेशन, संस्थेचे प्राचार्य डॉ. कौशल प्रसाद, विद्यार्थी प्रतिनिधी नील सुखटणकर व मिनल पाटील, ब्रेनवेव्हचे विद्यार्थी प्रतिनिधी शुभम विचारे इ. उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.परिक्षीत मांजरेकर व कु.अर्फा आवटे यांनी केले. प्राचार्य डॉ. कौशल प्रसाद यांनी मान्यवरांचे स्वागत व परिचय करून दिला. विद्यार्थी प्रतिनिधींनी कॉलेजमधील विविध स्तरावरील घटनांचा मागोवा घेतला व विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमाचे विशेष अतिथी समीर दुआ आपल्या भाषणात सहजसोप्या भाषेत आपल्या व्यक्तीगत जीवनातील उदाहरणावरुन विद्यार्थ्यांना जीवन विषयक मार्गदर्शन केले. विशेष अतिथी श्री. बी. बी. आहुजा यांनी आपल्या भाषणात इच्छा तेथे मार्ग या तत्वाला अनुसरुन साधेपणाने मिळवता येणाऱ्या यशावर भाष्य केले.कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या व लीला पूनावाला ट्रस्टच्या अध्यक्षा तसेच कार्पोरेट सल्लागार असलेल्या पद्मश्री लीला पूनावाला यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक यशस्वी होण्यासाठी आवश्यक ध्येयवादाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याची गरज विशद केली.कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती अरूणा कटारा यांनी संस्थापक अध्यक्ष श्री. प्रल्हाद पी. छाब्रिया यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाची आठवण करुन देत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासू वृत्तीचे महत्त्व स्पष्ट केले.

यावेळी अ‍ॅकॅडमीमधील गुणवंत विद्यार्थ्यांना चेअरमन प्राइझ व स्व.श्रीमती मोहिनी छाब्रिया अ‍ॅवॉर्ड प्रत्येकी दहा हजारची रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. तसेच गुणवंत गरजू विद्यार्थ्यांना होप फाऊंडेशन शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. तसेच न्यू एज्युकेशन सोसायटीच्या के.पी अभ्यंकर मुक बधीर विद्यालय या संस्थेला सामाजिक जाणीवेतून मदत करण्यात आली. प्रथम वर्ष इंजिनिअरींग मध्ये सर्वप्रथम येण्यासाठी व एकाच प्रयत्नात परीक्षा पास होण्यासाठी असलेले चेअरमन प्राइझ कु. अभिषेक भाटकर याने पटकाविले. इंजिनिअरींग अभ्यासक्रमात अ‍ॅकॅडमीमध्ये प्रत्येक शाखेतून प्रथम येण्यासाठी दिला जाणारा स्व.श्रीमती मोहिनी छाब्रिया अ‍ॅवॉर्ड इलेक्ट्रॉनिक्स शाखेतून रूपेश वाळके, इलेक्ट्रीकल शाखेतून स्नेहल सावंत, मेकनिकल शाखेतून रजत प्रभू, इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी शाखेतून रचिना पाटील, केमिकल शाखेतून बाबाजी सावंत, इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलिकम्युनिकेशन शाखेतून सानीया मुर्तुझा व एमसीए शाखेतून नीहा दमुरकर यांना प्रदान करण्यात आला. तसेच सनी सांभेकर, स्वरूपा बागडे, हर्षदा गावडे या विद्यार्थ्यांना होप फाऊंडेशन शिष्यवृत्ती देऊन गौरवण्यात आले. त्याचबरोबर, श्रीमती अरूणा कटारा, अध्यक्ष, होप फाऊंडेशन यांच्यावतीने खेळातील विशेष प्राविण्याबद्दल मुली व मुलांमधून सर्वोत्तम क्रीडापटू पारितोषिक दिले जाते. २०१७-१८ वर्षातील सर्वोत्तम क्रीडापटू म्हणून जयदीप प्रभू व श्रुती करकरे यांना गौरवण्यात आले. सर्वोत्तम विद्यार्थ्याचे पारितोषिक श्रुती करकरेने पटकाविले.

यावेळी फिनोलेक्स अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी [illegible] केलेली रेसिंग [illegible] सर्व मान्यवरांनी पहाणी करून कौतुक केले. ब्रेनवेव्हज अंतर्गत कलाकृती या कलादालनात विद्यार्थ्यांनी अतिशय कुशलतेने घडवलेल्या पॉट पेंटिंग, रांगोळी, चित्रकृती, फोटो गॅलरी आदी उपक्रमाबद्दल मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. डॉ. शारदा चौगुले यांनी इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलिकम्युनिकेशन शाखेत शिवाजी विद्यापीठातून प्राप्त केलेल्या पीएचडी साठी त्यांना गौरवण्यात आले. एनपीटीएल परीक्षेत विशेष यश प्राप्त केल्याबद्दल प्रा. सुजय माइनकर व प्रा. दत्तात्रय डेंगळे तसेच संस्थेमधील विशेष सेवेबद्दल दीपक मेस्त्री व अविनाश लिंगायत यांना गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. संजय कुलकर्णी यांनी केले.

यावेळी अ‍ॅकॅडमीचे विद्यार्थी, शिक्षकवृंद, पालक, परिसरातील मान्यवर व इतर श्रोतृवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. २५,२६ व २७ फेब्रुवारी २०१८ असे तीन दिवस सदर वार्षिक संमेलनाचा सर्व विद्यार्थी, पालकवर्ग व आमंत्रितांनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.